# महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

## जाहिरात

**"विधी सल्लागार" हे पद कंत्राटी तत्वाने भरणेबाबत.**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. गोरेगांव (पू.) मुंबई येथे कार्यरत असून महामंडळाच्या सुमारे ५२१ एकर परिसरातील जागेतील बाह्य चित्रिकरण स्थळे व कलागारे, चित्रपट, दुरदर्शन मालिका व जाहिरात यांच्या चित्रिकरणासाठी भाड्याने देण्यात येतात. करारनामा करणे, विविध न्यायालयीन बाबी (आस्थापना विषयक, जागा विषयक, निविदा प्रक्रीयेबाबत, प्रकल्प विषयक, अतिक्रमण, पुनर्वसन इ.) याबाबत कायदेशीर सल्ला, न्यायालयीन प्रकरणे हाताळणे, इ कामांसाठी महामंडळात पुर्ण वेळ किमान १ विधी सल्लागाराची आवश्यकता आहे.

करीता महामंडळात "विधी सल्लागार" यांची कंत्राटी तत्वाने ११ महिनेसाठी (कालावधी कमी/जास्त करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.) खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुलाखतीद्वारे भरणेकरीता खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

१. **पदसंख्या** :- १ (एक)

२. शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि वयोमर्यादा :-

   अ. शैक्षणिक पात्रता:- उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतलेली असावी आणि त्याच्याकडे वैध सनद असणे आवश्यक आहे.

   आ. अनुभव :- विधी सल्लागार पदासाठी विविध न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा किमान ७ ते १० वर्षांचा सराव (अनुभव)

   इ. उमेदवाराला जमीन विषयक, गुन्हेगारी, सेवा, प्रशासन आणि सर्व प्रकारचे कायदे आणि विभागीय चौकशी कार्यवाही यासंबंधी कायद्याच्या विषयाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे, जेणेकरून तो कायदेशीर विषय कुशलतेने हाताळू शकेल.

   ई. उमेदवाराला मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.

   उ. वयोमर्यादा:- ५० वर्षे पेक्षा जास्त नसावे.

३. **वित्तलब्धी** :- मुलाखती अंती एकत्रित मानधन ठरविले जाईल.

वरील अर्हता धारण करण्याऱ्या उमेदवारांनी आवश्यक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑनलाईन दि.२५.०९.२०२४ सायं. ५ वाजे पर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांचा अर्हता, अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सदर प्रक्रीया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी
व्यवस्थापकीय संचालक,
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# विधी सल्लागार अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | जन्म तारीख | |
| ३ | पत्र व्यवहारासाठी पत्ता | |
| ४ | ई- मेल | |
| ५ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | एकुण अनुभव | |
| ८ | न्यायालयीन प्रकरणे हाताळल्याचा तपशिल | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी